## MAHARASHTRA ACT No. VII OF 1980

### THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS (POSTPONEMENT OF ELECTIONS TO ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS AND AMENDMENT) (AMENDMENT) ACT, 1980

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ११ फेब्रुवारी १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम्. ए. धोत्रे.
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. VII OF 1980

### AN ACT TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS (POSTPONEMENT OF ELECTIONS TO ZILLA ARISHADS AND PANCHAYAT SAMITIS AND AMENDMENT ACT, 1979.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १८ फेब्रुवारी १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

### सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम ७.

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) अधिनियम, १९७९ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९७९ चा महा. १०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे नमूद केलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणूका लांबणीवर टाकणे व सुधारणा) अधिनियम, १९७९ यात, सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या १९७९ चा महा. अध्यादेश ८. यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, १९७९ हा दिनांक २१ सप्टेंबर १९७९ रोजी प्रख्यापित केला;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) (सुधारणा) अधिनियम, १९८० असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ

(२) तो, दिनांक २१ सप्टेंबर १९७९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० मध्ये कलम ३अ समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) अधिनियम, १९७९ यामध्ये कलम ३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९७९ चा महा. १०.

पंचायत समिती पुन:स्थापित होईतोपर्यंत प्रशासक नेमण्याची शक्ती.

"**३-अ** (१) कलम ३ च्या परंतुकामध्ये किंवा या अधिनियमाच्या किंवा **मुख्य अधिनियमाच्या** इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही समाविष्ट असले तरी, महाराष्ट्र **जिल्हा परिषदा** व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका **लांबणीवर टाकणे** व सुधारणा) (सुधारणा) अधिनियम, १९८० याच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही कारणांमुळे कोणत्याही निवडणुका घेणे व पंचायत समितीची पुन:स्थापना करणे शक्य झालेले नसेल त्याबाबतीत, राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, पुन:स्थापित पंचायत समितीची जीमध्ये गणपूर्ती झालेली असेल अशी पहिली सभा होईतोपर्यंत, अशा पंचायत समितीच्या शक्तींचा वापर करण्याकरिता व तिच्या कर्तव्यांचे पालन करण्याकरिता एका किंवा अधिक प्रशासकांची नेमणूक करता येईल. १९८० चा महा.

(२) पोट-कलम (१) खाली काढलेला आदेश **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध होण्याच्या तारखेस, कलम ३ च्या परंतुकाखाली ज्यांचा पदावधी वाढवण्यात येऊन जे पदावर राहिले असे जिल्हा परिषदांचे सभासद व पंचायत समितीचे सदस्य आपली सभासद किंवा यथास्थिति सदस्य म्हणून असणारी पदे रिकामी करतील.".

सन १९७९ चा अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, १९७९ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश ८.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेल्या, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे व सुधारणा) अधिनियम, १९७९ अन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही (करण्यात आलेल्या कोणत्याही नेमणुकीसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या उक्त अधिनियमान्वये करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. १९७९ चा महा. १०.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**

भाषा संचालक व पदसिद्ध उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.